## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४६७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०२/०८/२०१६.

**१) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक ३१/०७/२०१६ रोजी ०१.०० वा ते ०१/०८/२०१६ चे ०५.०० दरम्यान यातील फिर्यादी प्रणव विलासराव रायपुरकर वय ३३ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड गणेशपुर भंडारा यानी आपली मोटार सायकल हिरोहोंडा पॅशन क्र. एमएच ३६/बी ३१५० किमती २५,०००/—रु. ची आपल्या घरासमोरील अंगणात हॅन्डल लॉक करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पो.स्टे. भंडारा हे करीत आहे.

**२) घरातील सोना— चांदीच्या सामानाची चोरी . :—**

दिनांक २७/०७/०१६ ते ३०/०७/२०१६ वा. दरम्यान यातील फिर्यादी राधेशाम महागुजी चोपकर वय ५६ वर्ष, रा. सुयोग नगर स्टेशन रोड भंडारा हे पुणे येथे कुटुबासह घराला ताला लावुन गेले असता त्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे बंद घराचे समोरीलं दाराचा कोंडा तोंडुन आत प्रवेश करुन लोखंडी कपाटातील सोण्याचा मंगळसुत्र वनज ४५ ग्रॅम, एक सोण्याची चैन वजन ०५ ग्रॅम, सोण्याचा सुईदोरा कानातले एक जोड ०३ ग्रॅम, चांदीचे सिक्के १५ ते २० नग वनज १८० ग्रॅम, ०२/—रु. चे २०० नानी ०१ /—रु. चे २०० नानी असा एकुण १,१५,६००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८०भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) घरातील चांदीच्या सामानाची चोरी . :—**

दिनांक २१/०७/०१६ ते ०१/०८/२०१६ वा. दर यातील फिर्यादी सुरेश मारोती मडावी वय ५१ वर्ष, रा. संजय डोंगरवार यांचे घरी एसटी कॉलनी गुप्ता गार्डन जवळ गणेशपुर भंडारा हा कुटूंबासह घराला ताला लावुन यवतमाळ येथे गेले असतांना कोणीतरी अज्ञात चोराने घरासमोरील दाराचा कोंढा तोडुन आत ठेवलेले चांदीचे ०२ नानी असे अंदाजे वजन ५००ग्रॅम किंमती २४,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८०भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) दुकानातील व घरासमोरील मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक ३१/०७/०१६ ते ०१/०८/२०१६ चे ७.३० वा. दर यातील फिर्यादी सोपान पांडुरंग फुले वय ४२ वर्ष, रा. शहापुर यांनी बुट हाऊस समोरील शटर उघडुन आत प्रवेश करुन दुकानाच्या गल्ल्यामधुन नगदी ४,०००/—रु. व फिर्यादीचे घरी किरायदार यांचे घरा समोरील हिरो पॅशन प्रो कंपनीची मोटार सायकल क्र. एमएच ३५ /एबी ५०५२ किमती ३०,०००/—रु. असा एकुण ३४,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४६१,३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) ट्रॅक्टरची मोटार सायकला धडक, एक गंभीर . :–**

दिनांक २२/०७/०१६ चे २०.०० वा. दर यातील जखमी भुषन दिनेश पशिने वय २७ वर्ष, रा. मोहाडी हे आपल्या मोटार सायकल क्र. एमएच १४/ बीसी ६७३५ ने वरठी ते मोहाडी प्रवास करीत असता यातील अज्ञात आरोपी ट्रॅक्टर चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने व निष्काळजी पणे चालवुन जखमीचे वाहणास कारेमोरे राईस मिल समोर वरठी येथे धडक देवुन जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने तसेच अपघाताची माहिती न देता पळुन गेल्याने जखमीचे बयानावरुन व डॉ. रिपोर्ट वरुन पोस्टे मोहाडी येथे अप क्र. ००/१६ कलम २७९,३३८भांदवि सहकलम १३४/१७७ मोवाका अन्वये कागदपत्रे पोस्टे ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. चव्हान यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३८ भादंवि सहकलम १३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**६) अवैध रित्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०८/०१६ चे १८.०० वा. दर यातील फिर्यादी हे पोलीस खात्यातील लोकसेवक असुन त्यांनी कोर्थुर्णा बिट कामकाज संपवुन पोस्टेला परत येत असतांनी यातील आरोपीने आपल्या ताब्यातील बिना क्र. चे ट्रॅक्टरमध्ये मालकाचे सांगण्यावरुन अवैधरित्या बिना रॉयल्टी व अंदाजे ०१ ब्रास रेती कि. २,०००/–रु. ची चोरीने भरुन वाहतुक करतांना येथील आरोपी क्र. १ हा समक्ष मिळुन आला. व त्यास टॅक्टरसह पोस्टेला आणीत असतांना आरोपी क्र. २ ने रस्त्यात ट्रॅक्टर थांबवुन ट्रॅक्टरची चाबी काढुन लोकसेवकाने ताब्यात घेतलेली मालमत्ता घेवुन जाण्यास नाकार दिल्याने पळुन गेल्याने असे फिर्यादी सरतर्फे कुंभलवार पोस्टे वरठी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,१०९,१८३,१८६ भादंवि सहकलम २०७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कंभलवार पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) दारुडया वाहन चालकावर कारवाई . :–**

दिनांक ०१/०८/०१६ चे १२.४५ वा. दर यातील आरोपी मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल दारु पिऊन दारुच्या नशेत चालवितांना मिळुन आल्याने त्याचे डॉ. परीक्षण व सरतर्फे फिर्यादी पोशि धावडे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे तुमसर येथे कलम १८५(१) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. दुगावकर पो. स्टे तुमसर हे करीत आहे.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.